* प्रकरण - तिसरे *

# भारतीय आणि पाश्चिमात्य देश : सांस्कृतिक संबंध

* प्रकरण – निसर्ग *

# भारतीय आणि पाश्चिमात्य देश : सांस्कतिक संबंध

**स्त्री-पुरुष संबंध –**

'कुंपनापलीकडले शेत' ह्या कथासंग्रहातून अमेरिकन संस्कृतीचे दर्शन घडते. या संग्रहातील प्रत्येक कथेतून संस्कृतीचे वेगवेगळे पैलू दिसतात. या संस्कृतीतील परंपरा रीतिरिवाज माणसामाणसामधील संबंध या गोष्टीवर प्रकाश पडतो.

'गोष्ट टिना विशपची' या कथेमध्ये अजिता काळे यांनी पौंगडावस्थेतील मुलामुलींचे संबंध व त्यातून निर्माण झालेला प्रश्न दिसतो. या कथेत नववीत शिकणारी मुलगी आपल्या निग्रो मित्रापासून जे मूल राहतं ते मूल जन्माला घालण्याचा निश्चय करते. आई, वडील, समाज यांचा विचार न करता ते मूल ती जन्मालाही घालते. विशेष म्हणजे या सर्व गोष्टीकडे तिचे आईवडील एक कटू प्रसंग म्हणूनच पाहतात त्यांच्या दृष्टीने या गोष्टीला इतकंच महत्त्व आहे आणि तेथील समाज या गोष्टी नित्याच्या झाल्यासारख्या याकडे पाहतो. त्याही पुढे जाऊन तिथले शासन अशा कुमारी मातांसाठी शासकीय मदतही देते यावरूनच त्यांच्या संस्कृतीत असे संबंध अशी मुले हे गृहीतच धरले आहे असे दिसते.

'खजुराहो' या कथेत मुकुंद सोनपाटकी यांनी स्त्रीपुरुष संबंध आणि व्यवसाय यावर लक्ष दिले आहे. या कथेत 'पामेला' नावाची एक स्त्री दिवसा आपल्या स्वत:च्या हॉटेलमध्ये काम करते तर रात्री एका नाईटक्लबमध्ये नग्ननृत्य करते. यात वैशिष्टय म्हणजे ती नग्ननृत्य हे आपल्या नवऱ्याच्या परवानगीने करते. या गोष्टीचे नवऱ्यालाही काही वाटत नाही आणि समाजातील इतर लोकही यावर आक्षेप घेत नाहीत. पामेला नाईटक्लबमध्ये नाचते या गोष्टीकडे एक व्यवसाय म्हणून पाहिले जाते. अमेरिकेतील लोक व्यवसाय व पतीपत्नी संबंध या दोन वेगळया गोष्टी मानतात. चारित्र्य हे व्यवसायावरून ठरवले जात नाही असे दिसते.

'चकवा' या यशवंत कानिटकर यांच्या कथेत मुलींचे बिनधास्त आयुष्य दिसून येते. अमेरिकेतील मुलगा मुलगी असा भेदभाव केला जात नाही. 'लिंडा' नावाची एक मुलगी आपले आयुष्य अगदी बिनधास्तपणे जगते. तिला जगतानाही आपण एकटे आहोत. आपल्याजवळ

वहीणभाऊ आईवडील कोणीही नाहीत याचे काहीच वाटत नसते. अमेरिकेतील मुले थोडी मोठी झाली की आपल्या आईवडीलांना सोडून वेगळं राहतात. स्वत:चा खर्च स्वत: करतात. यासाठी मग छोटया छोटया नोकऱ्या करतात. आपल्या मनाला येईल तसे राहतात. त्यामुळेच त्यांच्या जीवनपद्धतीत मुलगा मुलगी असे वेगळेपण राहत नाही. या कथेतही 'लिंडा' ही अशीच बिनधास्तपणे आयुष्य जगणारी मुलगी दिसते. या मुलीवरूनच तेथील एकूण तरुणवर्ग कोणत्या प्रकारचे आयुष्य जगत आहे हे दिसते.

'बार मित्झ्वा' ही दिलीप व. चित्रे यांच्या कथा तर अमेरिकेतील कुटुंबसंस्था कशी आहे त्यांचे नाते संबंध कसे असतात हे सांगते. 'बार मित्झ्वा' हा प्रत्येक अमेरिकन माणसाच्या आयुष्यात येणारा प्रसंग असतो. यात मुलाचे वडील मुलगा वयाने मोठा झाला म्हणून आपल्या नातेवाईकांच्या आणि धर्मगुरूंच्या साक्षीने मदयाचा पहिला प्याला देतात. सर्वांच्या साक्षीने मुलगा मदय पिण्यास सुरुवात करतो. यातूनच अमेरिकेतील एक वेगळाच रिवाज लक्षात येतो. 'बार मित्झ्वा' या कार्यक्रमात कुटूंबातील सगळे नातेवाईक जमा होतात. यात जो कुटुंबप्रमुख असेल त्याची पहिली बायको तिचा दुसरा नवरा त्यांची मुले येतात. त्याचबरोबर कुटुंबप्रमुखाच्या बायकोचा पहिला नवरा त्याची दुसरी बायको त्यांची मुले येतात असे पहिले दुसरे नवरे त्यांच्या बायका मुले हे सर्व एकत्र गोळा होतात. अशा प्रसंगातून ते एकत्र येतात. ते एकत्र आल्यावर त्यांना काहीच वाटत नाही. जणू त्यांच्यात कधी असे संबंध नव्हतेच असे वागतात अशा त्यांच्या वागण्यातूनच नात्यांतील त्यांचे संबंध आणि तिकडे त्यांची पाहण्याची दृष्टी दिसून येते.

'हॅपी अवर' या अमान मोमीन यांच्या कथेत मुले व पालक यांच्यातील संबंध दिसून येतात. अमेरिकेतील माणसे पैसा आणि उपभोग्य वस्तू मिळवणे यांच्यामागे लागल्यामुळे त्यांच्याकडे मुलांना पाहण्यास पुरेसा वेळ नाही. यामुळेच मुलांच्यात व पालकांच्यात एक अदृश्य असे युद्ध सुरू आहे. मुलांना पालकांच्याबद्दल अजिबात जिव्हाळा नाही. उलटपक्षी मुले ही आपल्या आईवडिलांचा द्वेष करताना दिसतात. 'हॅपी अवर' या कथेतील नायक आपल्या वडीलांचा अतिशय द्वेष करतो आहे. अगदी वडीलांचा खून करण्यापर्यंत त्याची मजल गेली आहे हे त्या कथेतील प्रसंगावरूनच समजते.

'पद्धतशीर' या स्मिता पालिवाल यांच्या कथेत अमेरिकेत माणूस अगदी कोणत्याही मार्गाने पैसा मिळवतो. मग पैसा मिळवताना मार्ग चांगला की वाईट, चूक की बरोबर याचा विचार केला जात नाही. या कथेत एक कुटुंब वाहनांचा पद्धतशीरपणे अपघात करून विमा कंपनीकडून भरपाई मिळवून पैसा मिळवत असतात. पोलिसांना मालकाला, विमा एजंटाला प्रत्येकाला वाटा मिळतो अशा प्रकारे सर्वजणच पद्धतशीरपणे पैसा मिळवतात. आणि महत्त्वाचे म्हणजे या सगळयाचे कुणालाच काहीच वाटत नाही.

'एका वस्तीची कथा' – ललित गंभीर' यांच्या या कथेतही अशाच प्रकारे आपल्या अपंगत्त्वाचा वापर पैसे मिळवण्यासाठी कर असा सल्ला इतर सर्व मित्र देताना दिसतात. म्हणजे अपंगत्त्वाचा वापर पैसे मिळवण्यासाठी केला तर त्यांना काही वावगे वाटत नाही हे एकूण कथेतील वर्णनातून दिसून येते.

'जित्याची खोड' – इंदिरा रानडे' यांच्या कथेमध्ये माणसाला प्रत्येक गोष्ट हवी असते आणि त्या हव्यासापोटी माणूस रात्रंदिवस पळतो आहे हे दिसून येते. शेवटी माणसाला सर्वकाही मिळते अगदी त्याला जे जे हवं ते ते मिळतं पण तरीही त्याला पहिल्यापासून काही वाईट खोडी लागलेल्या असतात. त्या काही जात नाहीत. त्या खोडी त्याची पाठ सोडीत नाहीत अगदी त्या सवयी त्यांच्या मुलांच्यातही उतरतात हे ''जित्याची खोड' या-कथेत दिसून येते.

वेगवान जीवन हे अमेरिकेतील जीवनाचे एक प्रमुख वैशिष्टयच म्हणता येईल. अमेरिकेत घडयाळ माणसांसाठी की घडाळयासाठी माणूस असा प्रश्न पडावा इतकं आयुष्य वेगवान आहे. आता तर विज्ञानानं इतकी प्रगती केली आहे की जगातल्या कोणत्याही माणसाशी काही सेकंदात संपर्क साधता येतो. आणि इंतरनेटमुळे रात्रंदिवस अखंडपणे काम सुरू असते. इथे कोण थांबत नाही. थांबला की संपला असं सगळयांनाच वाटतं की काय म्हणूनच प्रत्येकजण कशाच्यातरी मागे धावताना दिसतो. यात प्रत्येकजण आपल्याला जास्तीत जास्त सुविधा मिळाव्यात आपलं आयुष्य जास्तीत जास्त चैनीत कसं जगता येईल हे पाहताना दिसतात. जीवनाकडं उपभोग वस्तू म्हणून पाहिल जातं. असं त्यांच्या एकूण जीवन पद्धतीमुळं वाटतं.

या कथासंग्रहातूनही या जीवनपद्धतीचं दर्शन घडतं. या कथासंग्रहातील काही कथांच्या प्रसंगातून त्यातील पात्रांच्या संवादातून वेगवान जीवन पद्धती दिसून येते. 'कुठे देश माझा' या

वसंत काळे यांच्या कथेत वेगवान जीवन पद्धतीमुळे वयस्क माणसांचे नवनवीन प्रश्न निर्माण होतात हे दिसून येते. अमेरिकेत वयस्क माणसांच्याकडे लक्ष देण्यास त्यांची विचारपूस करण्यास कुणाकडेच वेळ नाही. त्यामुळे हे लोक मानसिकदृष्टया हतबल होताना दिसतात. त्यांना आपले पेन्शनचे आयुष्य हे नर्सिंगहोममध्ये म्हणजेच वृद्धाश्रमात घालवणे भाग पडते. विशेष म्हणजे त्यांची मुलेच त्यांना वृद्धाश्रमात भरती करतात. मुलांनाही असे करावे लागते वेगवान जीवनाचाच हा एक परिणाम दिसतो.

याच कथेत भारतीय अमेरिकेत जाऊन राहिलेले आहेत त्यांच्या मनाची वेगवान जीवनामुळे कशी कुचंबणा होते हे दिसते. यात दिसंबरला आपल्या आईला अमेरिकेत न्यायचे असते पण वेगवान जीवनामुळे त्याला आईला नेण्यासाठी वेळच मिळत नाही. शेवटी त्याची आई मरते. नंतरही आपण आईला अमेरिकेत आणू शकलो नाही याची खंत त्याला वाटत राहते. हा वेगवान जीवनाचाच एक प्रसंग आहे.

'पैलतीर' या संध्या कर्णिक यांच्या कथेत अवी व निमू या भारतीय जोडप्यावर वेगवान जीवनाचा कसा परिणाम होतो हे दिसून येते. यात निमूचे वडील भारतात खूप आजारी असतात. पण अवी व निमू हे अमेरिकेत स्थायिक असतात त्यामुळे त्यांना भारतात वडिलांकडे येता येत नाही. निमू फोनवरच वरचेवर खुशाली विचारत होती. व त्यांना भेटायला जाण्याचे ठरवत होती असं ठरवत असतानाच अचानक एक दिवस निमूचे वडील मरतात. शेवटी ती फोनवरच बहीणभावाचे, आईचे सांत्वन करते. तिला वडीलांना शेवटचसुद्धा पाहता येत नाही.

'जित्याची खोड' या कथेत इंदीरा रानडे यांना पॉल जेव्हा आपल्या बालपणाची कथा सांगतो. तेव्हा त्या वर्णनातून वेगवान जीवनाचे दर्शन होते,. अमेरिकेतील लहान मुलेही यातून सुटली नाहीत. मुलांनाही झटपट पैसे मिळवण्याचे वेड लागले आहे. त्यामुळे मुलांचे बालपण हरवले आहे. मुले छोटया मोठया नोकऱ्या करतात मग पैसे कमी पडायला लागल्यावर वाममार्गही स्वीकारतात. मुलांच्यात गुन्हेगारीप्रवृत्ती बळावते मुले यात वहातच जातात. वेगाने जीवन जगण्यामुळे मुलांच्या बालमनावर परिणाम झालेला दिसून येतो.

'परदेशवास : एक पत्रात्मक चिंतन' – जयंत भालचंद्र बापट[३] यांच्या या कथेत परदेशातील जीवनपद्धती सविस्तरपणे आली आहे. इथे प्रत्येकजण मला हे हवं, मला ते हवं अस

करत पळत असतो. प्रत्येकाच्यात एक लालसावृत्ती दिसून येते. पण त्यामुळे त्यांच्यात असमाधानीवृत्ती वाढत आहे. मुलं १२-१४ वर्षाची झाली की आईबापांना बोर्ड (जेवणखाण्याचे पैसे) देतात. त्यामुळे छोटया छोटया नोकऱ्या करतात व स्वत:चा खर्च स्वत: करतात. एवढया लहान वयापासून मुलं या वेगवान जीवनात अडकतात. या यंत्रयुगातील माणसांना उतारवयातील माणसांची गरज उरली नाही. त्यामुळे हे लोक उद्विग्नपणे आपले आयुष्य रिटायरमेंट व्हिलेजमध्ये घालवत असतात. एकूणच जीवनात एक प्रकारची पोकळी निर्माण झाल्यासारखी वाटते.

'कित्ता गिरवणारा कारकून!' - विजय पाटार[४] यांच्या या कथेत भारतातून व अन्य देशातील लोक अमेरिकेत कायमचे स्थायिक झाले आहेत त्यांच्याबाबत कोणती स्थिती होते ते लक्षात येते. जागतिक मंदीमुळे प्रत्येकांवर बेकारीची टांगती तलवार आली त्यामुळे वेगवान जीवन जगण्याच्या पद्धतीला रूळलेल्या लोकांची स्थिती कशी होते हे दिसून येते. प्रत्येकजण आपले आज काय होणार आणि नोकरी गेली तर पुढे काय करायचं याच चिंतेत दिसतो.

'हॅपी अवर' या कथेतील नायक जेव्हा आपले बालपण कसे गेले हे सांगतो त्यावेळेस मुलांच्याकडे पाहायला पालकांना वेळ नाही हे प्रकर्षाने जाणवते. पालक पैसा व चैनी या गोष्टीत अडकल्यामुळे मुलांचे संगोपन व संस्कार यासारख्या गोष्टींकडे लक्ष पुरवण्यास त्यांच्याकडे वेळ नसतो. त्यामुळेच मुले व पालक यांचे संबंध जिव्हाळयाचे नाहीत हे या कथेतून दिसून येते.

अमेरिका व भारतीय संस्कृती या दोन संस्कृती अगदी भिन्न भिन्न आहेत. अमेरिकन संस्कृतीत काही गोष्टी ग्राह्य मानल्या जातात तर त्याच गोष्टी भारतीय संस्कृतीत निषिद्ध मानल्या जातात. समाज अशा गोष्टींना स्वीकारत नाही. अशा गोष्टींमुळे भारतीय समाजात माणसाची प्रतिष्ठा कमी होते असे मानतात त्यामुळेच सामान्य माणूस अशा गोष्टींपासून चार हात लांबच असतो.

या कथासंग्रहात आलेल्या बऱ्याच गोष्टी भारतीय संस्कृतीत निषिद्ध मानल्या आहेत. जसे 'गोष्ट टिना बिशपची' या कथेत नववीत शिकणारी मुलगी समाजाचा आई वडीलांचा विचार न करता आपल्या वर्गमित्राबरोबर शारीरिक संबंध टेवते. त्यावर कळस म्हणजे या संबंधातून जे गर्भ राहतो त्या बाळाला जन्म देण्याचे ठरवते. बाळाला जन्मही देते नंतर मात्र तिला एकटेच राहावे लागते. ती एकटीच बाळाला सांभाळत राहते नंतर मात्र तिला आपल्याच मुलाचा सांभाळ

करता येत नाही. यावर उपाय म्हणून ती दुसऱ्या एका पुरुषाबरोबर राहू लागते. ही गोष्ट भारतीय संस्कृतीत अगदी निषिद्ध मानली जाते.

'परदेशवास : एक पत्रात्मक चिंतन' यात परदेशात मुले कशी राहतात हे समजते. मुले थोडी मोठी झाली की छोटया छोटया नोकऱ्या करतात व स्वत:च्या पायावर उभी राहतात. घरात राहत असल्याबद्दल व जेवणाबद्दल मुले आईवडिलांना बोर्ड देतात. कोणताही निर्णय घेताना मुले आईवडिलांना विचारीत नाहीत. त्यांना तशी गरज वाटत नाही. असे वाचल्यावरसुद्धा कसे तरी वाटते. भारतीय समाजात मुले अशी वागताना दिसत नाही.

'चकवा' या कथेतील लिंडा ही नायिका अगदी बिनधास्त वागताना दिसते. एकटीच राहते. बारमध्ये, पबमध्ये काम करते. रात्री अपरात्री कुठेही भटकताना दिसते. एवढं बिनधास्त आयुष्य भारतीय तरुणी जगत नाहीत.

'खजुराहो' या कथेत 'पामेला' ही जी नायिका आहे ती आपल्या नवऱ्याच्या परवानगीने बारमध्ये नग्ननृत्य करीत असते. भारतातील नवऱ्याने अशी परवानगी कधीच दिली नसती.

'आव्हान' या कथेत नायक आपल्याच बायकोला तिच्या मित्राबरोबर फिरण्यास मुभा देतो. त्याची ती दुसरी बायको असते. बायको त्याच्यापेक्षा तरुण असते त्यामुळे तो या मैत्रीकडे मुद्दाम जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतो. असे भारतातल्या नवऱ्याने कदापि केले नसते.

'कुठे देश माझा' या कथेत वयस्कर माणसांना नर्सिंगहोम दाखल केले जाते. नर्सिंगहोममध्येच त्यांचे रिटायरमेंटनंतरचे आयुष्य जाते. त्यांना तिथे मुलेच दाखल करतात. अगदी नेहमीची पद्धत असल्यासारखी त्यांना वेगळे वाटतच नाही. भारतात मात्र आजी आजोबा हे कुटुंबातच राहतात.

<u>पाश्चात्यांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोण</u> –

भारतीय समाजात बायकोचा पहिला नवरा त्यांची मुले नवऱ्याची पहिली बायको त्यांची मुले यांच्याशी संबंध ठेवला जात नाही. पण अमेरिकेत अशा नातेवाईकांना 'बार मित्झ्वा' सारख्या कार्यक्रमात अशा नातेवाईकांना अगदी आवर्जून बोलावले जाते. हा सर्व कार्यक्रम साग्रसंगीतपणे पार पाडला जातो. वैशिष्टय म्हणजे या कार्यक्रमात सर्वांच्या देखत त्यांचा धर्मगुरू

मुलाला मदयाचा प्याला भरून देतात म्हणजे मदय पिण्यास रितसर परवानगी देतात. भारतात मात्र मदय पिण्यास अशी परवानगी कधीच दिली जात नाही. वरील सर्व गोष्टी भारतीय संस्कृतीत निषिद्ध मानल्या जातात.

भारतीय संस्कृतीत ज्या गोष्टी निषिद्ध मानल्या जातात त्या गोष्टींकडे पाहण्याचा अमेरिकन लोकांचा दृष्टिकोन वेगळाच आहे. या कथासंग्रहात असे बरेच प्रसंग आले आहेत. 'गोष्ट टिना विशपची' या कथेत टिना ही आपल्या वर्गमित्राबरोबर कुणाच्या परवानगीशिवाय लग्न करते. त्याच्याबरोबर राहते त्याच्या मुलाला जन्म देते ह्या सर्व गोष्टी तिथले लोक ग्राह्यच धरून चालतात. मुले असे वागणारच असे त्यांना वाटते. प्रथम थोडीशी कुरकुर करतात. पण नंतर मात्र सर्व गोष्टी स्विकारतात. या गोष्टींकडे फारसे लक्ष दिले जात नाही कदाचित लैंगिक स्वातंत्र्याचा हा परिणाम असू शकेल. पण गांभिर्याने या गोष्टींकडे पाहिले जात नाही.

'परदेशवास : एक पत्रात्मक चिंतन' यात परदेशात मुले कशी राहतात आणि त्यांचे पालक मुलांकडून कोणत्या अपेक्षा करतात हे ही दिसून येते. मुले आईवडिलांना बोर्ड देतात. या गोष्टींचे पालकांनाही काही वाटत नाही. कारण त्यांनाही त्यांच्या लहानपणी हेच केलेले असते. त्यामुळे मुलांकडून बोर्ड घेणे पालकांना गैर वाटत नाही. उलट मुले स्वत:च्या पायावर उभे राहिली याचे त्यांना समाधान वाटते. मुले कोणत्याही निर्णयात आईवडिलांचे मत विचारत नाहीत. आईवडिलांनाही मुलांनी आपले मत विचारावे असे वाटत नाही. त्यांच्या आयुष्यातील निर्णय त्यांच्यात्यांनीच घ्यावा स्वत:चा निर्णय स्वत: घेण्यास समर्थ व्हावे असे त्यांना वाटते. त्यामुळे मुले त्यांचे मित्र त्यांचे वागणे याकडे फारसे गांभिर्याने बघत नाहीत. मुलांनी स्वत:चे करियर स्वत: घडवावे असे एकूण मत दिसून येते.

'चकवा' या कथेतील नायिका ही 'लिंडा' या कथेत एक बिनधास्त तरुणी म्हणून भेटते. अमेरिकेत अशा बऱ्याच मुली एकटयाच राहतात. नोकरी करतात आपले आयुष्य ऐषआरामात घालवतात. वैशिष्टय म्हणजे अशा तरुणींकडे समाजही फारसे लक्ष देत नाही. तरुण मुली अशा राहणारच अशा वागणारच हे जणू सर्वांना गृहीत धरलेलच दिसतय. त्यात काहीच नाही असं तिथल्या लोकांना वाटतं, प्रत्येकाच आयुष्य एक खाजगी बाब आहे. त्यामुळे आपलं आयुष्य कस जगायचं हे ज्याच त्यानं ठरवायच असतं असंच सगळयांना वाटत त्यामुळेच दुसरा कसा जगतो

त्याच्या खाजगी आयुष्यात इतरजण डोकावत नाहीत. प्रत्येकाला आपलं जीवन आपल्या मतानं जगण्याची मुभा असते.

'खजुराहो' या कथत 'पामेला' रात्री बारमध्ये नवऱ्याच्या परवानगीने बारमध्ये नग्ननृत्य करीत असते. तिथल्या लोकांना खुद्द तिच्या नवऱ्यालाही याचे काही वाटत नाही. कारण या गोष्टीकडे फक्त एक व्यवसाय म्हणून ते लोक पाहतात. पैसे मिळवण्यासाठी केलेली एक कृती एवढयाच दृष्टिकोनातून त्याकडे पाहिले जाते. पामेला म्हणते जोपर्यंत माझ्यात व माझ्या पतीत प्रेमाचं विश्वासाचं नातं आहे तोपर्यंत मी कुठेही नाचले तरी आमच्या संबंधात काही फरक पडत नाही. आमचे प्रेम हे राहणारच या प्रेमात अंतर येणार नाही. अमेरिकेत व्यवसाय व नातेसंबंध या दोन वेगवेगळया गोष्टी मानल्या जातात. नग्ननृत्य करणे याला एक व्यवसाय म्हणून स्थान आहे. या गोष्टीकडे ते लोक प्रतिष्टा, चारित्र्य अशा गोष्टी म्हणून पहात नाहीत. पैसा मिळवण्यासाठी अशा कृती केल्या तर त्या मान्य केल्या जातात.

'आव्हान' या कथेत नायक हा जाणीवपूर्वक मुद्दाम आपल्या पत्नीच्या विवाहबाह्य संबंधाकडे दुर्लक्ष करतो. कारण त्याला आपली बायको आपल्यापेक्षा जास्त तरूण आहे तिला एका तरूण साथीदाराची गरज आहे हे चांगलेच माहीत आहे. अशी गरज तिला वाटली तरी त्यात वावगे काहीच नाही ती तिच्या शरीराची एक गरज आहे असे त्याला वाटते. म्हणजे तो आपल्या बायकोला असे विवाहबाह्य संबंध ठेवण्यास मूक संमतीच देतो. थोडक्यात आपल्या तरूण बायकोची शारीरिक गरज लक्षात घेऊन तसे वागतो. असे वागणे त्या नवऱ्याला योग्यच वाटते हेच वैशिष्टय म्हणावे लागेल.

'कुठे देश माझा' या कथेत वयस्क माणसाचे समाजातील स्थान दिसून येते. ही माणसे समाजाला एक अडगळ वाटते. यांच्याकडे बघायला कुणालाच वेळ नाही. त्यामुळे ह्या माणसांनाही एक विफल अवस्था आल्यासारखी वाटते. प्रत्येक रिटायर माणसाने हे नर्सिंगहोममध्येच राहायचे असते असा जणू नियमच असल्यासारखे सगळे वागताना दिसतात. ही वयस्क माणसे आपणहून किंवा त्यांची मुले त्यांना रिटायरमेंट व्हिलेजमध्ये भरती करतात. विशेष म्हणजे या गोष्टीचे पालकांना व मुलांना काहीच वाटत नाही. कारण त्यांच्या मते वयस्क माणसांनी असेच आयुष्य जगायचे असते.

'आमचा गराज सेल' यामध्ये घरातील जास्तीचे सामान कसे विकायला काढले जाते ते सांगितले आहे. यातून अमेरिकन लोक प्रत्येक गोष्टीकडे वापरा व फेकून दया या तत्त्वानेच पाहतात हे दिसून येते. त्यांना त्याचे काही वाटत नाही. ज्या गोष्टीचा आपल्याला आता उपयोग नाही त्या गोष्टी लगेच निकालात काढायच्या त्याच्याशी त्यांची काहीच भावनिकता नसते. म्हणजेच त्यांची 'युज अँड थ्रो' संस्कृती दिसून येते.

'बार मित्झ्वा' सारख्या कार्यक्रमात आपले सगळे पाहुणे, मित्र बोलावले जातात यात्र पहिली बायको त्यांचे नवरे त्यांची मुले असे नातलग बोलावले जातात. आपली एवढी लग्ने झाली यात त्यांना काहीच गैर वाटत नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हा परिणाम असू शकेल. तसेच 'बार मित्झ्वा' या कार्यक्रमात धर्मगुरू वयात आलेल्या मुलाला त्याच्या आयुष्यातील प्रथम मदयाचा प्याला भरून देतात. अगदी सर्व नातलग, मित्रमंडळी यांच्या साक्षीने मदयाचा प्याला भरून देतात. म्हणजे अप्रत्यक्षपणे व्यसन लावण्यास कारणीभूत होतात पण या सर्वांकडे हे एक आनंदाचा सोहळा म्हणून बघतात. मुलगा दारू पिणे यात त्यांना काहीच गैर वाटत नाही उलट मुलगा वयात आला आता तो मदय पिण्यास धर्माज्ञानेनुसार ग्राह्य झाला असे त्यांना वाटते. त्यामुळेच 'बार मित्झ्वा' सारखे सागरसंगित कार्यक्रम केले जातात. अशा बऱ्याच गोष्टींकडे हे लोक गृहीत गोष्टी म्हणूनच बघतात. या गोष्टी तिथल्या समाजातल्या अतिसुविधा, पैसा, स्वातंत्र्य, लैंगिक स्वातंत्र्य अशा गोष्टींमुळे घडतात असे वाटते. आणि वैशिष्टय म्हणजे तिथल्या लोकांनी हे सर्व स्विकारलयं.

वरील सर्व घटना व प्रसंग अमेरिकेतले पाहिले तिथे प्रत्येक गोष्टीकडे किती सामान्यपणे पाहिलं जात. तिथल्या माणसांना या गोष्टींचे काहीच वाटत नाही एकूणच जगण्याची पद्धती व जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आपल्यापेक्षा वेगळाच आहे. हे लक्षात येते. पण वरील सर्व प्रसंग हे भारतात अजिबात घडत नाही असे म्हणताच येणार नाही.

'गोष्ट टिना बिशपची' या कथेत टिना ही नववीतली मुलगी आहे. ती आपल्या निग्रो मित्राबरोबर संबंध ठेवते व त्यापासून होणाऱ्या मुलाला जन्म देण्याचे ठरवते. आईवडिलांचा विरोध सहन करून ती मुलाला जन्म देते. भारतात अशा गोष्टी होतात. काही वेळेला अनैतिक संबंधातून गर्भधारणा होते पण भारतीय मुली अशी अपत्ये जन्माला घालत नाहीत. अनैतिक

संबंधातून गर्भधारणा झालीच तर त्या मुलीचे आईवडील हे अगदी गुपचूप कुणालाही कळू न देता मुलीचा गर्भपात करतात. काही घडलेच नाही या अविर्भात सगळे काही व्यवस्थित चालू आहे असे समाजात नातलगात दाखवतात. अशा गोष्टी दडपून टाकल्या जातात. कारण भारतीय समाजात अशा गोष्टींशी व समाजातील मान प्रतिष्ठा यांचा अगदी निकटचा संबंध आहे त्यामुळेच असे संबंध व गर्भधारणा आतल्याआतच दडपून टाकले जाते.

'खजुराहो' या कथेत 'पामेला' रात्री बारमध्ये नग्ननृत्य करीत असते. अशा नृत्याला तिच्या नवऱ्याची परवानगी असते. असे भारतात कदापि घडणार नाही. पण एखादा पुरुष जर व्यसनाधिन असेल तर त्याची बायको पैसा मिळवण्यासाठी किंवा आपल्या कुटुंबाची गुजराण करण्यासाठी नाईलाज म्हणून अशी गोष्ट करेल. पण असा व्यवसाय जरी ती स्त्री करीत असली तरी ती आपला व्यवसाय इतर लोकांपासून समाजापासून लपवून ठेवण्याचा प्रयत्न करते. चारचौघात मी असा व्यवसाय करते हे मान्य करीत नाही. अशावेळी ती उडवाउडवीची उत्तरे देते. थोडक्यात भारतीय समाजात असे असले तरी ते गुपचूपपणे चालते. कारण समाज अशा गोष्टी जाहीरपणे स्वीकारत नाही.

'कुठे देश माझा' या कथेत अमेरिकेतील वयस्क माणसांचे कसे हाल होतात हे दाखवले आहे. भारतात वयस्क माणसांचे हाल होत नाही. भारतातही म्हाताऱ्या आईवडिलांना न बघणारी मुले आहेत. त्यांची अडचण होते. म्हातारी माणसे काही मुलांना बोजा वाटतात. पण तसे ते त्यांच्या तोंडावर बोलून दाखवत नाहीत. भारतातही वृद्धाश्रमे निघू लागली आहेत. पण अजूनही आईवडिलांना वृद्धाश्रमात दाखल करणारा मुलगा चांगला नाही असंच मानतात. समाजात अशा मुलांना मान मिळत नाही. पण भारतातही मोठ्या शहरात वेगवान जीवनपद्धती सुरू झाल्यामुळे म्हाताऱ्या आईवडिलांना पाहण्यास वेळ नाही म्हणून मुले आईवडिलांना वृद्धाश्रमात दाखल करताना दिसतात.

'आव्हान' या कथेत वयस्क नवरा आपल्या बायकोच्या अनैतिक संबंधाकडे मुद्दाम दुर्लक्ष करताना दिसतो. भारतीय नवरा असा कदापि करणार नाही. बायको कितीही तरुण असली तरी तिची शारीरिक गरज म्हणून असे संबंध नवरा कधीच चालवून घेणार नाही. पण भारतीय समाजात काही ठिकाणी छुपे अनैतिक संबंध दिसून येतात. असे संबंध हे कुणाच्या डोळयावर

येणार नाहीत याची दक्षता घेतली जाते. असे संबंध ठेवणारी स्त्री ही चांगली स्त्री म्हणून ओळखली जात नाही. एकूणच असे संबंध समाज व माणसे स्वीकारत नाहीत. तरीही असे छुप्या पद्धतीने संबंध ठेवले जातात.

'चकवा' या कथेत लिंडा या विनधास्त मुलीचे आयुष्य दाखवले आहे. मुलगी कशी स्वतंत्र विनधास्त आयुष्य जगते हे दाखवले आहे. भारतीय मुली अशा रीतीने आईवडिलांपासून विभक्त राहून जगताना दिसत नाहीत. भारतीय समाजात मुलीने असे राहणे मान्य केले जात नाही. मुलींनी आईवडिलांजवळ विशिष्ट चौकटीतच जगले पाहिजे असे मानले जाते. जर असे मुलगी वागत नसेल तर ती समाजाच्या दृष्टीने चांगली मुलगी नसते अशा मुलीशी सहजा कोणी विवाहही करायला धजत नाही. पण आजकाल काही मुली बिनधास्त जगताना दिसतात. ज्या मुली पैसे मिळवतात स्वत:च्या पायावर उभ्या आहेत त्यांचे वागणे बिनधास्त असल्याचे दिसते. हल्ली भारतातल्या मुलीही फॅशन म्हणून इतरांचे अनुकरण करण्यात व बिनधास्त वागण्यात आघाडीवर असल्याचे दिसते.

'पद्धतशीर' या कथेत पद्धतशीरपणे अपघात घडवून काही लोक विमा कंपनीकडून कसे पैसे मिळवतात हे दाखवले आहे. भारतात अजून तरी काही अशी पद्धत नाही. पण जर अपघात झालाच तर ज्या लोकांचा अपघात होतो त्यांच्यापेक्षा त्यांचे नातेवाईकच सरकारी मदत जास्तीत जास्त कशी मिळेल हे पाहताना दिसतात. जो अपघातात मेला त्याचे सोयरसुतक काहीच नसते. मेल्यानंतरही त्याच्या मरणाचे जास्तीत जास्त पैसे कसे मिळतील हे पाहिले जाते.

'परदेशवास : एक पत्रात्मक चिंतन' या पत्रात परदेशातील मुलांचे जीवन व त्यांची विचार करण्याची पद्धती दिसून येते. तिथली मुले आपल्या जीवनातील कुठलेच निर्णय आई वडिलांच्या सल्ल्याने घेत नाहीत. भारतात असे होत नाहीत. इथे आईवडीलच मुलांच्याबाबतीतील सर्व निर्णय घेताना दिसतात. पण हल्ली उच्चभ्रू कुटुंबात आईवडिलांना मुलांच्याकडे लक्ष दयायला वेळ नसतो. त्यामुळे मुले आपले निर्णय आपणच घेताना दिसतात. या कुटुंबामध्येही कौटुंबिक वातावरण दिसून येत नाही. काही ठिकाणी तर असे वागण्यातच पालक व मुले धन्यता मानतात. वर आणि आम्ही आधुनिक विचारांचे आहोत म्हणून समाजात

सिरवतात. एकूणच हळूहळू भारतीय मुलांचे जीवन अमेरिकन पद्धतीचे होणार असे वाटू लागलेय.

'हॅपी अवर' या कथेत पालक व मुले यांचे संबंध कसे असतात हे दिसून येते. पालक व मुले यांच्यात जवळीकतेचे नाते नाही. पालकांना मुलांना देण्यासाठी वेळ नाही. त्याच्याकडे मुलांकडे पाहण्यास वेळ नसल्यामुळे मुलांकडे दुर्लक्ष होते. भारतात मात्र पालक नेहमी जागरूक असलेला दिसतो. आपण करत असलेल्या प्रत्येक गोष्टीचे आपल्या मुलांवर काय परिणाम होईल याचा विचार भारतीय पालक करतो. पण अलिकडच्या काळात शिकलेली माणसे ही पैसा व प्रतिष्टेच्या मागे लागल्यामुळे त्यांचे आपल्या मुलांकडे दुर्लक्ष होताना दिसते. त्यामुळे अशा मुलांचे व पालकांचे संबंध फारसे जिव्हाळयाचे नसतात.

'या ऋणानुबंधाच्या' या कथेत एक आई आपल्या मुलींना अमेरिकन मुलांपासून दूर टेवण्यासाठी काय काय करते हे दाखवले आहे. ही आई मुद्दाम आपले घर विकते. दुसरीकडे लांब घर घेते हे सर्व आपल्या मुलींचे अमेरिकन मुलांशी संपर्क येऊ नये म्हणून करते. पण तरीही तिच्या मुलींचे व त्या मुलाचे संबंध असल्याचे शेवटी तिच्या लक्षात येते. भारतातही प्रत्येक आई वडील आपल्या मुलीचे इतर मुलांशी संबंध प्रस्थापित होऊ नये म्हणून प्रयत्न करताना दिसतात. पण इतके करूनही मुली आईवडिलांना चोरून मुलांशी संबंध ठेवताना दिसतात.

'आमचा गराज सेल' यात घरातल्या जुन्या वस्तूंची अमेरिकेत कशी विल्हेवाट लावली जाते हे दाखवले आहे. तिथे जुन्या वस्तूंचेही पैसे केले जातात. भारतात मात्र जुन्या वस्तू अशा विकल्या जात नाहीत. पण अलिकडच्या काळात उत्पादने वाढल्यामुळे श्रीमंत घरातील बायका जुने कपडे देऊन भांडी खरेदी करताना दिसतात. म्हणजेच हा ही जुन्या वस्तूंचा विल्हेवाट लावण्याचाच एक प्रकार म्हणता येईल.

वरील सर्व गोष्टींमुळे भारतीय समाजात अमेरिकेप्रमाणे घडतच नाही असे म्हणता येणार नाही. भारतीय समाजात बरेच लोक शिकलेले आहेत. आणि या शिकलेल्या लोकांचा एक समज झालेला आहे की अमेरिकेतील लोकांच्या जीवनाचे अनुकरण म्हणजेच आधुनिकीकरण होय. त्यामुळे झपाटयाने हे लोक अमेरिकन पद्धती स्वीकारताना दिसतात. अमेरिकन समाजाप्रमाणे अगदी खुलेआम नसल्या तरी चोरी छुपे सर्व गोष्टी भारतीय समाजातही चालतात.

एवढाच फरक आहे की अमेरिकन लोकांप्रमाणे या गोष्टींचा गवगवा केला जात नाही तर सगळयाच गोष्टी भारतीय समाजात लपूनछपून केल्या जातात.

# संदर्भ सूची


१. रानडे इंदिरा – "कुंपनापलीकडले शेत" "जित्याचे खोड"
श्रीविद्या प्रकाशन, पुणे वर्ष १९८४ पृष्ट क.२५ ते ४०

२. गंडभीर ललिता – "एका वस्तीची कथा" "कुंपनापलीकडले शेत"
श्रीविद्या प्रकाशन, पुणे वर्ष १९८४ पृष्ट क.७४ ते ८१

३. बापट जयंत भालचंद्र – "परदेशवास: एक पत्रात्मक चिंतन" "कुंपनापलीकडले शेत"
श्रीविद्या प्रकाशन, पुणे वर्ष १९८४ पृष्ट क.१४० ते १४९

४. पाठारे विजय – "किस्ता गिरवणारा कारकून" "कुंपनापलीकडले शेत"
श्रीविद्या प्रकाशन, पुणे वर्ष १९८४ पृष्ट क.१९० ते १९५